—: प्रेस नोट :— दिनांक : २२.१२.२०२०

| | |
|---|---|
| घटक | अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती. |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) श्री.दिलीप बापु कोळी, वय ५५ वर्षे,पद — निरिक्षक,राज्य उत्पादन शुल्क कार्यालय,अमरावती.वर्ग — २<br>२) श्री.अरविंद मोतीरामजी नांदणे, वय ४० वर्षे,पद — सहा.दुय्यम निरिक्षक,राज्य उत्पादन शुल्क कार्यालय,अमरावती.वर्ग — ३ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४५,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | पहीला टप्पा ३०,०००/— रुपये |
| घटनास्थळ | वासुदेव अपार्टमेन्ट चे मुख्य गेट जवळ कॅम्प,अमरावती. |
| घटना तारीख व वेळ | दि.२२/१२/२०२० चे सकाळी अंदाजे ०८.५६ वा. ते ०९.५० वा. दरम्यान |

**<u>थोडक्यात माहिती</u> :—** यातील तकारदार हे हॉटेल व बार चे मालक असुन त्यांना बियर बार लायसन्स काढुन देण्यासाठी मदत केल्याबद्दल मोबदला म्हणुन तकारदार यांचेकडुन राज्य उत्पादन शुल्क कार्यालय,अमरावती येथील अधिकारी/कर्मचारी यांनी पहीले काही रक्कम घेतली आहे. त्यामध्ये निरिक्षक श्री.दिलीप कोळी यांनी पहीले १५,००० रूपये घेतल्यानंतर सुध्दा ४५,००० रूपये लाचेची मागणी करीत असल्याची दि.०३.१२.२०२० रोजी तकार दिली असता दि.०३.१२.२०२० व दि.२१.१२.२०२० रोजी पंचासमक्ष राज्य उत्पादन शुल्क कार्यालय,अमरावती येथे जावुन लोकसेवक निरिक्षक श्री.कोळी यांची पडताळणी केली असता तकारी प्रमाणे निरिक्षक श्री.कोळी यांनी तकारदार यांना बियर बार लायसन्स काढुन देण्यासाठी मदत केल्याबद्दल मोबदला म्हणुन ४५,००० रूपये लाचेची मागणी करून पहीला टप्पा म्हणुन ३०,००० रूपये स्वीकारण्याचे मान्य केले.तसेच पडताळणी दरम्यान सहा.दुय्यम निरिक्षक श्री.नांदणे यांनी सुध्दा तकारदारास महीनेवारी हफ्ता म्हणुन २,००० रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याचे मान्य केले.वरून निरिक्षक श्री.कोळी यांनी तकारदार यांना फोन करून लाच रक्कम घेवुन बोलाविल्याने आज दि.२२.१२.२०२० रोजी सापळा कारवाई आयोजीत केली असता निरिक्षक श्री.कोळी यांनी पहीला टप्पा ३०,००० रूपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले व गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परीक्षेत्र, अमरावती श्री.विशाल गायकवाड सा.,प्रभारी अपर पोलीस अधीक्षक व घटक प्रमुख श्री.गजानन पडघन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.राहुल वसंतराव तसरे व पो.कर्मचारी विनोद कुंजाम, युवराज राठोड,सुनिल जायभाये व चालक अकबर हुसैन यांनी पार पाडली.

अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,अमरावती विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तकार असल्यास अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :— अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, ललित सेंटर, परांजपे कॉलनी, कॅम्प, अमरावती.
टोल फ्री नंबर — १०६४ दुरध्वनी कमांक — ०७२१—२५५२३५५,२५५३०५५.

पोलीस उप अधिक्षक अ‍ॅन्टीकरप्शन ब्युरो, अमरावती
सत्यमेव जयते

(signature)
( राहुल तसरे )
पोलीस निरिक्षक
अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो,अमरावती.
मो.क्र.८८०५९६३१००

Scanned with CamScanner